## स्थायी समिती
## दाखल विषय – दि. २७/९/२०१६

**विषय क्रमांक :– १३४४ त्वर्य**

मा.अविनाश बागवे, मा.सौ.अश्विनी कदम, मा.सुशिला नेटके, मा.फारुक इनामदार, मा.सौ.मुक्ता टिळक, मा.सौ.सुनिता गलांडे, मा.सौ.दिपाली ओसवाल व मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे यांचे दि. २७/९/२०१६ चे पत्र.

महापालिकेतील वरीष्ठ अधिकारी मा.अति.महा.आयुक्त (वि) हे दिर्घकालीन रजेवर जाणार असल्याने त्यांचा पदभार मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचेकडे सोपविण्यात येईल. त्यांच्याकडील कामाचा प्रचंड व्याप पहाता त्यांना मा.अति.महा.आयुक्त (वि) कडील कार्यालयीन कामकाज पाहताना कसरत करावी लागणार आहे .

तरी मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचेकडील पदाचा कार्यभार महापालिकेतील सक्षम अधिकाऱ्यांकडे एकवट अथवा विभागून देण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रमांक :– १३४५ त्वर्य**

मा.अविनाश बागवे व मा.सौ.सुनिता गलांडे यांचे दि. २७/९/२०१६

विकास इंडिया कन्स्लटींग प्रायव्हेट लि. यांची पुणे महानगरपालिका पथ विभागाकडील रस्ते, वाहतुक नियोजन(प्रकल्प) विभागाकडील पूल व ड्रेनेज, मलनि:सारण विभागाकडील कामाकरिता पॅनेलवर कन्स्लटंट म्हणून नेमणूक करण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रमांक :– १३४६ त्वर्य**

मा.राजेंद्र शिळीमकर व मा.अविनाश बागवे यांचे दि.२७/९/२०१६ चे पत्र.

पुणे महानगरपालिका पॅनेलवरील असलेले आर्किटेक्ट मे.टॅमॅटो आर्कीटेक यांनी महापालिकेचे नुकसान होईल असे काम केलेले आहे. त्यांची चौकशी करुन आठ दिवसात अहवाल सादर करण्यास तसेच त्यांना पॅनेलवरुन काढून टाकण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रमांक :– १३४७ त्वर्य**

मा.अविनाश बागवे, मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे, मा.सौ.दिपाली ओसवाल, मा.सौ.अश्विनी कदम, मा.सौ.मुक्ता टिळक, मा.सौ.सुनिता गलांडे व मा.सुशिला नेटके यांचे दि. २७/९/२०१६ चे पत्र.

ज्या खात्याची भरती आहे असे संबंधित खात्याच्या प्रमुख अधिकाऱ्यांचा निवड समितीमध्ये समाविष्ट करणेस तसेच बीपीएमसी ॲक्ट ५४(१ आणि २) प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रमांक :– १३४८ त्वर्य**

सुसाँग – दक्षिण कोरिया येथील मा. उपमहापौर यांच्या अध्यक्षतेखाली ०७ सदस्यीय शिष्टमंडळ मंगळवार, दिनांक २८ जून २०१६ ते गुरूवार, दिनांक ३० जून २०१६ रोजी पुणे महानगरपालिकेच्या भेटीला आले होते. सुसाँग – दक्षिण कोरिया या शहराबरोबर पुणे महानगरपालिकेने सन २०१२ – २०१३ मध्ये सिस्टर सिटी करार केलेला होता. परंतु सदरचा करार जुन २०१६ मध्ये संपुष्टात आल्याकारणाने सदर करार आगामी काळात नव्याने प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने चर्चा करण्यासाठी सदरचे शिष्टमंडळ पुणे महानगरपालिकेच्या भेटीवर आलेले होते.

मंगळवार, दि २८ जून २०१६ ते गुरूवार, दिनांक ३० जून २०१६ दरम्यान सदर शिष्टमंडळास पुणे महानगरपालिकेच्या विविध प्रकल्पांस भेटी आयोजित करण्यात आलेल्या होत्या. सदर शिष्टमंडळाच्या मंगळवार, दि. २८ जून २०१६ रोजीच्या रात्रीच्या जेवणाची व्यवस्था मा. महापौर यांचे तोंडी आदेशावरून रामी ग्रँड हॉटेल, आपटे रोड, शिवाजीनगर, पुणे या ठिकाणी करण्यात आलेली होती.

सदर शिष्टमंडळाच्या जेवणाप्रित्यर्थ रामी ग्रँड हॉटेल कडून आलेले रक्कम रूपये २१,६२६/– ( अक्षरी रक्कम रूपये – एकवीस हजार सहाशे सव्वीस रूपये फक्त ) चे बिल मा. महापौर यांनी स्वतः रोख स्वरूपात संबंधितांना अदा केलेले आहेत. तरी सदरचे बिल खालील अर्थशिर्षकावर खर्ची टाकणेस व मा. महापौर यांना अदा करणेस पश्चात मान्यता मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे जा.क्र. ३७०२ दि. २७/९/२०१६ चे पत्र.

सन २०१६ – २०१७ चे अंदाजपत्रक, १. मुख्य देखरेख वसुली वगैरे, क. महानगरपालिका व स्थायी समिती, १.नगरसचिव यांचे कार्यालय, ६९. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील मनपाला भेट देणाऱ्या प्रमुख पाहुण्यांचे स्वागत, निवास व भोजन कार्यक्रमप्रसंगी ( खात्याचा कोड नंबर RE11A169), मान्य तरतूद रक्कम रूपये २०,००,०००/– (अक्षरी र.रूपये वीस लाख रूपये फक्त )

विषय क्रमांक :– १३४९ त्वर्य

पुणे महानगरपालिकेतर्फे प्रतिवर्षी संगीत, नाट्य, कला क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या कलाकारास बालगंधर्व पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. यंदाचा ( सन २०१६ ) चा बालगंधर्व पुरस्कार **सुप्रसिद्ध धृपद गायक, श्री. सईद उद्दीन डागर** यांना शनिवार, दिनांक २७ ऑगस्ट २०१६ रोजी सायंकाळी ०६.०० ( सहा ) वाजता बालगंधर्व रंगमंदिर, शिवाजीनगर, पुणे ०५ येथे प्रदान करण्यात आला होता.
सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणेकरिता श्री. प्रकाश पायगुडे (निवेदक), २०१ , ए बिल्डिंग , लालबाग सोसायटी, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे ३७ यांना बोलविणेत आले होते. सदरप्रसंगी त्यांनी सूत्रसंचलनाचे काम केले होते.
सूत्रसंचलनाचे कामाप्रित्यर्थ त्यांनी र.रू. ५०००/-( पाच हजार फक्त ) चे बिल सादर केलेले असून सदरचे बिल खालील अर्थशिर्षकावर खर्ची टाकणेस व संबंधितांना बिले अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे जा.क्र. ३७०३ दि. २७/९/२०१६ चे पत्र.

सन २०१६ – २०१७ चे अंदाजपत्रक, १. मुख्य देखरेख वसुली वगैरे, क. महानगरपालिका व स्थायी समिती, १.नगरसचिव यांचे कार्यालय, ३. संकिर्ण ( खात्याचा कोड नंबर RE११A१०३), मान्य तरतूद रक्कम रूपये ७५,००,०००/- ( अक्षरी र.रूपये पंच्याहत्तर लाख रूपये फक्त )

विषय क्रमांक :– १३५० त्वर्य

प्रभाग क्र. २७ ब प्रभागातील विविध ठिकाणी तसेच किनारा हॉटेल ते एम.एस.ई.बी. ऑफिसपर्यंतच्या मुख्य रस्त्यास फुटपाथ व रेलिंग करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सनराज कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९९,९९,९४६/- पेक्षा १९.२२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.८०,७७,९५६=३७ पैकी उपलब्ध रकमेपर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/५६७ दि. २६/९/२०१६ चे पत्र.

विषय क्रमांक :– १३५१ त्वर्य

प्रभाग क्र. ४६ ब मध्ये पाणी पुरवठा सुरळीत करणे करीता कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार विनायक सोपानराव निंबाळकर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २९,९६,४८१/- पेक्षा १६.४१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२५,०४,७५८=४६ कमी/अधिक भाववाढ आणि विशेष भाववाढ सुत्रानुसार होणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेणेसाठी त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/लपापु/५६८ दि. २६/९/२०१६ चे पत्र.

विषय क्रमांक :– १३५२ त्वर्य

प्रभाग क्र. ७३ अ मध्ये अहिल्यादेवी चौक ते खुशबू हॉटेल जलवाहिनी टाकणे व रस्ते खोदाईतील जलवाहिन्या जिरविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार श्री.मल्लिकार्जुन बसप्पा ताळीकोट्टी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ६९,९३,४९३/- पेक्षा १४.२७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५९,९५,५२१=५५ अधिक सर्वसाधारण व विशेष भाववाढ सुत्रानुसार येणारी फरकाची जादा रक्कम देणेस अगर कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/५६९ दि. २६/९/२०१६ चे पत्र.

विषय क्रमांक :– १३५३ त्वर्य

हडपसर इंडस्ट्रीयल इस्टेट ते भिमनगर दरम्यान पाण्याची लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्सपैकी ठेकेदार लक्ष्मीनारायण एन्टरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ७४,४१,७७८/- पेक्षा २१.२१९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५८,६२,७०७=१२ कमी/अधिक भाववाढ आणि विशेष भाववाढ सुत्रानुसार होणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेणेसाठी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/लपापु/५७० दि. २७/९/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १३५४ त्वर्य**

कार्यकारी अभियंता (पथ) क्र. १ यांचे कार्यक्षेत्रातील विश्रामबागवाडा, भवानी पेठ, धनकवडी क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत व परिसरामध्ये विविध कंपन्या व संस्था मार्फत करण्यात आलेल्या खोदकामाचे रीनिस्टेटमेंट करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.न्यु इंडिया कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ३,४९,९९,६२३/– पेक्षा १९.०८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२,८३,२१,६९४=९३ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/५७१ दि. २७/९/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १३५५ त्वर्य**

प्रभाग क्र. ३६ ब मधील संजीवन हॉस्पिटल जवळील नाल्यामध्ये बारीक व्यासाची ड्रेनेज लाईन बदलून मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.देवकर एन्टरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४९,९९,९९१/– पेक्षा २२.९९९९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३८,४९,९९३=५७ पर्यंत अधिक भाववाढ सुत्रानुसार व विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) होणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि/५७२ दि. २७/९/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १३५६ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेमार्फत साकारण्यात आलेले प्रकल्प तसेच भावी काळात पूर्णत्वास जाणा–या प्रकल्पांची व विविध विकास कामांची प्रसिद्धी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (ड) प्रकरण पाच संविदा मधील कलम २(२) अन्वये र.रु. ३,४३,७२,७४५/– पर्यंत काम करुन घेणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/एल/५७७ दि.२७/९/२०१६ चे पत्र.

१) पुणे महानगरपालिकेमार्फत साकारण्यात आलेले प्रकल्प तसेच भावी काळात पूर्णत्वास जाणा–या प्रकल्पांची व विविध विकास कामांची प्रसिद्धी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (ड) प्रकरण पाच संविदा मधील कलम २(२) अन्वये र.रु. ३,४३,७२,७४५/– पर्यंत काम करुन घेणेस.

२) या कामापोटी करावयाचा खर्च र.रु. ३,४३,७२,७४५/– मा.महा.आयुक्त यांच्या विषयपत्रामध्ये नमूद केलेल्या बजेटहेडवर खर्ची करणेस

३) केलेल्या कामाचे बिल र.रु. ३,४३,७२,७४५/– संबंधित एजन्सीजना माहिती व जनसंपर्क अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग, आकाशचिन्ह विभाग यांचेमार्फत अदा करणेस.

४) संबंधीत कामकाजाचे अंमलबजावणीसाठी विस्तृत कार्यप्रणालीकरिता मा.महापालिका आयुक्त यांचे स्तरावर कार्यालय परिपत्रक प्रस्तृत करणेस.

४.अ) समिती नेमणे – अतिरिक्त आयुक्त, Cafo, दक्षता, अंतर्गत अर्थान्वीक्षक व संबंधित विभाग प्रमुख, सदर समिती मा. महापालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली धोरण व अंमलबजावणीसाठी जबाबदार राहील. याची दक्षता घेण्यात येईल, या अटीवर मान्यता देणे. महानगरपालिकेच्या अस्तित्वातील धोरणाशी विसंगत नसेल याची काळजी समिती मार्फत घेण्यात येईल.

५) निविदनातील मा.महा.आयुक्त यांच्या विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या अ.क्र.१ (Newspapaers) बाबत जनसंपर्क अधिकारी यांचेमार्फत व अ.क्र. २ ते ५ (Radio Channels , Cine Slides, News Channels, Digital media ) माहिती व तंत्रज्ञान प्रमुख यांचेमार्फत आदा करणेस.

(टिप :– सदर कामांचे दर निश्चित स्वरुपाचे असल्याने वर्तमानपत्रात जाहिर निविदा प्रसारित करुन यापेक्षा कमी दर येण्याची शक्यता नाही.)

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**